# भारतीय स्त्रियांची शैक्षणिक वाटचाल व शिक्षण क्षेत्रातील योगदान: प्राचीन, मध्ययुगीन कालखंड ते सद्यस्थिती

**संजना संजय भालकर** संशोधक शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

Email ID sanjanabhalkar12@gmail.com

**प्रा.डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई** प्राचार्या आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.

Email-drpratibhadesai@gmail.com

---

**सारांश**:-

भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये वैदिक प्राचीन कालखंडापासून स्त्री शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान दिले गेले आहे. कारण साक्षात विद्येची देवता माता सरस्वती होत्या ,त्यांना ज्ञानाची देवी सांख्यस्वरूपीनी असेही म्हणतात. ती ब्रम्हांडातील सर्व वाहक तत्वांची देवता आहे. माता सरस्वती ही हिंदू ,बौद्ध आणि जैन या तिन्ही धर्मांमध्ये ज्ञानदेवता आहे. यावरून असे दिसून येते की प्राचीन कालखंडापासून स्त्रियांनी शिक्षणामध्ये सहभाग व शैक्षणिक वाटचालीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलला आहे व शिक्षण क्षेत्रामध्ये योगदानासाठी भारतातील स्त्रियांनी प्राचीन , मध्ययुगीन काळापासून व सद्यस्थितीमध्ये अध्यापनामध्ये देखील मोलाची भर दिल्याचे यामध्ये दिसून येते आहे.

**मुख्य संबोध:-** भारतीय स्त्रियांची शैक्षणिक वाटचाल ,शिक्षण क्षेत्रातील योगदान ,प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड व सद्यस्थिती.

**प्रस्तावना**:-

ज्या समाजात स्त्रियांचा दर्जा जोपासला जातो त्या समाजाचा विकास जलद गतीने होत असतो. हे सांगत असताना विख्यात समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर म्हणतात की, "समाजाची प्रगती अथवा अधोगती विकसितपणा अथवा मागासलेपणा हा मुख्यतः त्या समाजातील स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर अर्थात सामाजिक दर्जावर अवलंबून असतो." एकूणच समाजाच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणून स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन काळानुसार बदलत गेल्याचे आपल्याला दिसून येते. कोणत्याही कालखंडाच्या इतिहासाचा बारकाईने अभ्यास केला असता भारतीय स्त्रीला मिळालेल्या सामाजिक दर्जा , शैक्षणिक योगदान व शैक्षणिक वाटचाल हे अभ्यासणे महत्त्वाचे ठरेल. प्राचीन काळातील, मध्ययुगीन व सद्यस्थितीतील स्त्रियांचा शैक्षणिक वाटचाल ,शैक्षणिक योगदाणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न यामध्ये करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१. प्राचीन भारतीय स्त्रियांचा शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करणे.

२. मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

३. सद्यस्थितीमधील भारतीय स्त्रियांच्या शिक्षण क्षेत्रातील प्रमाण ,नवनवीन तंत्रे व अध्यापन पद्धतींचा अवलंब करून शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व :- प्रस्तुत संशोधन हे भारतीय स्त्रियांची शैक्षणिक वाटचाल व शिक्षण क्षेत्रातील योगदान यांची माहिती जाणून घेण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल. त्याचप्रमाणे प्राचीन काळातील, मध्ययुगीन काळातील स्त्रियांनी शिक्षण क्षेत्रामध्ये कोणकोणते महत्त्व घडविले व आज सद्यस्थितीमधील भारतीय शिक्षण क्षेत्रामध्ये अध्यापन पद्धतींचा व त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाची माहिती समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

**संशोधनाची परिमर्यादा:-**प्रस्तुत संशोधन हे भारतीय प्राचीन काळातील, मध्ययुगीन काळातील व सद्यस्थितीमधील स्त्रियांची शैक्षणिक वाटचाल ,शैक्षणिक योगदान व अध्यापन पद्धती या पुरतेच मर्यादित राहील.

संशोधन पद्धती:-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने दस्ताऐवजांचे विश्लेषण व सर्वेक्षण संशोधन पद्धती या संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**विश्लेषणात्मक विषयविवेचन:-**

**प्राचीन कालखंड**:-भारतात वैदिक कालीन स्त्रियांना मान होता त्यांना मुलांच्या बरोबरीने आवश्यक असे शिक्षण मिळत असे व उपनयनाचा अधिकार होता. उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनास सुरुवात होई. ब्रह्मवादिनी व सद्योद्वाहा असे विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी मुली आजन्म ब्रह्मचर्य पाळून वेदविद्येचा व ब्रह्मविद्येचा अभ्यास करीत.

पठणाशिवाय स्वतंत्र लेखनही त्या करीत.लोपमुद्रा विश्ववारा व घोषा या विदुषींनी रचलेल्या ऋग्वेदात आढळतात. ब्रह्मयज्ञाच्या वेळी केल्या जाणाऱ्या तर्पणात सुलभा, मैत्रेयी, गार्गी व वाचक्नवी या विदुषी स्त्रियांचीही नावे आढळतात. याज्ञवल्क्य यांची पत्नी मैत्रेयी आत्म-ज्ञानविषयक जिज्ञासेबद्दल प्रसिद्ध होती. विदेह जनकाच्या राजसभेत जी आध्यात्मिक चर्चा चाले, तिच्यात गार्गी प्रमुख होती. तिने एका प्रसंगी याज्ञवल्क्यालाही वादात कुंठित केले होते. ब्रह्मवादिनी पुरुषयांप्रमानेच अध्यापनाचा व्यवसाय करीत. त्यांना उपाध्याया किंवा आचार्या अशी संज्ञा होती. वैदिक कालखंडात बहुतेक स्त्रियांना महत्त्वपूर्ण मर्यादांशिवाय शिक्षण घेण्याची परवानगी होती. त्यानंतरच्या काळात स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले नाही. यावेळी महिला विद्वानही उपस्थित होते. या काळातील शिक्षितांनी स्त्रियांना ब्रह्मवादिनी आणि सद्योद्वाह या दोन गटात विभागले होते. पूर्वीचे तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्राचे आजीवन विद्यार्थी होते. लग्न होईपर्यंत सद्योद्वाह अभ्यास चालू ठेवायचे. अपला, घोष आणि विश्वावरा यांसारख्या अनेक महिला कवयित्री आणि तत्त्वज्ञ होत्या.

स्मृतिकाळ (इ.स.४०० — १०००) स्मृती निरनिराळ्या काळांत रचल्या गेल्या आहेत. त्यांपैकी काही ( गौतम, आपस्तंब, मनु ) पहिल्या–दुसऱ्या शतकांत रचल्या गेल्या. त्यातील पुरुषांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण मर्यादित होता. मुलींच्या दृष्टीने ते अंधारयुग होते. या काळात स्त्रियांवर अनेक निर्बंध लादले गेले. मुलींचे उपनयन नाममात्र होई.

याज्ञवल्क्यांसारखे स्मृतिकार त्याहीविरुद्ध होते. वेदकाळी यज्ञ करणारी, वेदसूक्त रचणारी व ब्रह्मवादिनी म्हणून गौरविली गेलेली स्त्री स्मृतिकाळात अविद्या ठरली. मनू म्हणतो — पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने। रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमअर्हति॥ (मनु. ९.३) तथापि अशा प्रतिकूल कालातही उच्चभ्रू कुटुंबातील मुलींना, विशेषतः राजघराण्यातील मुली, सरदार-सरंजामदारांच्या मुली आणि गणिका व तत्सम महिला यांना, शिक्षकांकरवी शिक्षण मिळत असे. अशा काही सुविद्य कवयित्रींनी धर्मशास्त्र-तत्त्वज्ञानादी विषयांचा व्यासंग करून काव्यानिर्मिती केली. या काळातील रेवा, रोहा, माधवी, अनुलक्ष्मी, पहई, बद्धवही आणि शशिप्रभा या सात कवयित्रींचा उल्लेख हालाच्या गाथा सप्तशक्तिमध्ये आढळतो.

**मध्ययुगीन कालखंड :-**

लंडन मिशन बंगाली गर्ल्स स्कूल, कलकत्ता चर्च मिशनरी सोसायटीला दक्षिण भारतात अधिक यश मिळाले. मुलींसाठी पहिली बोर्डिंग स्कूल १८२१ मध्ये तिरुनेलवेली येथे सुरू झाली. १८४० पर्यंत स्कॉटिश चर्च सोसायटीने २०० हिंदू मुलींच्या संख्येसह सहा शाळा बांधल्या. जेव्हा ते शतकाच्या मध्यभागी होते, तेव्हा मद्रासमधील मिशनऱ्यांनी त्याच्या बॅनरखाली ८,००० मुलींचा समावेश केला होता. १८५४ मध्ये ईस्ट इंडियन कंपनीच्या कार्यक्रम: वुड्स डिस्पॅच द्वारे महिलांच्या रोजगार आणि शिक्षणाला मान्यता देण्यात आली. हळुहळू, त्यानंतर, स्त्री शिक्षणात प्रगती झाली, परंतु सुरुवातीला प्राथमिक शाळा स्तरावर लक्ष केंद्रित केले गेले आणि ते समाजातील श्रीमंत वर्गाशी संबंधित होते. महिलांसाठी एकूण साक्षरता दर १८८२ मध्ये ०.२% वरून १९४७ मध्ये ६% पर्यंत वाढला. पश्चिम भारतात, ज्योतिबा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू केली तेव्हा स्त्री शिक्षणाचे प्रणेते बनले. पूर्व भारतात, राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथ्युन यांसारख्या प्रख्यात भारतीय समाजसुधारकांच्या महत्त्वपूर्ण योगदानाव्यतिरिक्त, १९ व्या शतकातील भारतामध्ये स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यात अग्रणी होते. रामगोपाल घोष, राजा दक्षिणरंजन मुखर्जी आणि पंडित मदन मोहन तरकालंकर यांसारख्या समविचारी समाजसुधारकांच्या सहभागाने त्यांनी १८४९ मध्ये कलकत्ता (आताची कोलकाता) मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली ज्याला धर्मनिरपेक्ष नेटिव्ह फिमेल स्कूल म्हणले जाते, जे नंतर बेथुन स्कूल म्हणून ओळखले जाऊ लागले. १८७९ मध्ये, कलकत्ता विद्यापीठाशी संलग्न असलेल्या बेथून कॉलेजची स्थापना झाली, जे आशियातील सर्वात जुने महिला महाविद्यालय आहे.

१८७८ मध्ये, कोलकाता विद्यापीठ महिला पदवीधरांना पदवी कार्यक्रमांमध्ये प्रवेश देणारे पहिले भारतीय विद्यापीठ बनले, त्याआधी कोणत्याही ब्रिटिश विद्यापीठांनी असे करणे सुरू केले. हा मुद्दा नंतर १८८३ च्या इल्बर्ट विधेयकाभोवतीच्या विवादादरम्यान मांडण्यात आला, हा प्रस्तावित कायदा आहे ज्यामुळे भारतीय न्यायाधीशांना युरोपियन गुन्हेगारांचा न्याय करता येईल. भारतातील अँग्लो-इंडियन समुदायाने मोठ्या प्रमाणावर या विधेयकाला विरोध केला आणि असा दावा केला की भारतीय (पुरुष आणि स्त्रिया दोघेही) मोठ्या प्रमाणावर अशिक्षित आहेत आणि त्यामुळे ते युरोपियन गुन्हेगारांना न्यायालयात न्याय देण्यास अयोग्य आहेत. या विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या भारतीय महिलांनी या विधेयकाला विरोध करणाऱ्या अँग्लो-इंडियन महिलांच्या तुलनेत त्या अधिक शिक्षित असल्याचे नमूद करून प्रतिसाद दिला, भारतातील महिलांनी युनायटेड किंगडममध्ये राहणाऱ्या महिलांपेक्षा शैक्षणिक पदव्या मिळवल्या असल्याचे निदर्शनास आणून दिले.

**सद्यस्थितीमधील भारतीय स्त्रियांच्या शिक्षण क्षेत्रातील सद्यस्थिती व योगदानाचा अभ्यास**

आज भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देशांपैकी एक मानला जातो ,जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून चीनला मागे टाकले आहे. ही कामगिरी केवळ सर्वांसाठी शिक्षण आणि लिंग समानता सुनिश्चित करून शक्य झाले आहे. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देणे ,स्त्री साक्षरता सुनिश्चित करणे हे भारताच्या यशामागील प्रमुख घटक आहेत. गेल्या दशकापासून स्त्री विकास व महिला शिक्षणात अभूतपूर्व वाढ झाल्याचे आकडेवारीतून दिसून येते .भारत पूर्वी कधीही न पाहिलेल्या सामाजिक ,आर्थिक ,शैक्षणिक विकासाकडे प्रगती करीत आहे. कारण अधिकाधिक् भारतीय स्त्रियांचा त्यांच्या शिक्षण आणि सक्षमीकरणाद्वारे त्यांच्या अर्थव्यवस्थेचा भाग बनत आहेत.

**भारतात सद्यस्थिती सुधारणेसाठी झालेले कार्यक्रम:-**

१.सर्व शिक्षा अभियान २.इंदिरा महिला योजना

३. बालिका समृद्धी योजना ४.राष्ट्रीय महिला कोश

५.महिला समृद्धी योजना ६.रोजगार आणि उत्पन्न देणारी प्रशिक्षण सह उत्पादन केंद्रे.

७.ग्रामीण भागातील महिला आणि बालकांच्या विकासाचा कार्यक्रम

८.महिला आणि मुलींसाठी आपत्कालीन वसतिगृहे

९.उच्च शिक्षणासाठी संधी व शिष्यवृत्ती

१०.आरक्षण व ११.लाडकी बहीण योजना

**स्त्री शिक्षकांचे प्रमाण :-**

आज भारतात स्त्री शिक्षकांचे पुरुषांच्या तुलनेत प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. २०२३ -२४ मध्ये स्त्री शिक्षकांची संख्या ५२ लाख झाली आहे तर पुरुष शिक्षकांची संख्या घटून ४५ .७ ला झाले आहे. टक्केवारीत पाहिल्यास महिला शिक्षकांचा वाटा ३.३ % ने वाढून ५३.३ % झाला आहे तर पुरुष शिक्षकांचा वाटा ३ % वरून ४६.६ % झाला आहे.

स्त्री शिक्षकांची शिक्षणक्षेत्रामधील सद्यस्थितीतील प्रगतीचा थोडक्यात आढावा:

१. यामध्ये स्त्री शिक्षिका विद्यार्थी हिताचे विविध उपक्रम राबवितात शिवाय अभिनव अध्ययन-अध्यापन पद्धती यामध्ये कृती आधारित अध्ययन ,प्रोजेक्ट लर्निंग याद्वारे त्यांच्यात शिक्षणाची गोडी निर्माण करतात.

२. स्त्री शिक्षिका आपल्या अभ्यासू व संशोधक वृत्तीने विषयाचे सखोल ज्ञान घेऊन शिक्षकांना प्रशिक्षण देतात.

३. सध्या स्त्री शिक्षिका विविध समित्यांवर यामध्ये बालभारती, एससीईआरटी, एनसीईआरटी , डायट, शाळासिद्धि, मुक्त विद्यालय मंडळ, साहित्य क्षेत्रात, साहित्य संमेलने यासारख्या समित्यांवर कार्य करून शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक स्त्रियांनी योगदान दिले आहे.

४. आज स्त्री शिक्षिका ई-बालभारती ,क्यू. आर कोड निर्मिती, साहित्य निर्मिती ,रोबोटिक शिक्षण ,ऑनलाइन शिक्षण ,वर्चुअल क्लासेस राज्य, देश,राष्ट्रीय पातळीवर सक्रिय योगदान शिक्षण क्षेत्रामध्ये देत आहेत.

५. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जर्नल्स मध्ये रिसर्च पेपर करणे व दैनिकांमध्ये आपल्या शैक्षणिक अनुभव, वाटचाल व योगदान शिक्षण क्षेत्रामध्ये देत आहेत आणि स्त्री शिक्षिका म्हणून पुढील समाजासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी ,भूमिका आज पार पाडत आहेत.

**संशोधनाचे निष्कर्ष:- संशोधनाचे उद्दिष्टानुसार निष्कर्ष**

उद्दिष्ट क्र.१

१.प्राचीन भारतीय स्त्रियांचा शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करणे.

निष्कर्ष :-१ भारतात ब्राम्हवादिनी स्त्रिया पुरुषांप्रमाणेच अध्यापनाचा व्यवसाय करीत .त्यांना उपाध्याय किंवा आचार्य अशी संज्ञा देखील असे .यामध्ये लोपामुद्र ,विश्वतारा व घोषा,सुलभ ,मैत्रेयी ,गार्गी यांची नांवे आढळतात व शैक्षणिक क्षेत्रात मोठा वाटा यामध्ये यांनी दिलेला आहे.

उद्दिष्ट क्र.२

२. मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

निष्कर्ष :-२ स्मृतीकाळ किंवा मध्ययुगीन काळ या कालखंडामध्ये पुरुषांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन मर्यादित होता.फक्त उच्चभ्रू महिलांना शिक्षण मिळे. मा.ज्योतिबा फुले,सावित्रीबाई फुले ,फातिमा शेख यांनी महिलांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली.भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ,मुख्याध्यापिका या सावित्रीबाई फुले याच होत्या. स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यात

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड बिल महत्वाचे ठरले.सर्वसामान्य स्त्रियांना यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक ,कौटुंबिक हक्क मिळाले.

उद्दिष्ट क्र.३

३. सद्यस्थितीमधील भारतीय स्त्रियांच्या शिक्षण क्षेत्रातील प्रमाण ,नवनवीन तंत्रे व अध्यापन पद्धतींचा अवलंब करून शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

निष्कर्ष :-३ मध्ययुगीन कालखंडात झालेल्या स्त्री विषयक चळवळीमुळे सद्यस्थितीमधील स्त्री ही आज एक भारताची सुजाण नागरिक,भारताच्या विकासात महत्वाचा वाटा देणारी ठरली आहे ,कौटुंबिक ,सामाजिक जबाबदारी सांभाळत ,राष्ट्रीय जबाबदारीबरोबरच स्वता:ला देखील तेवढेच महत्व आजची स्त्री देत आहे.यामध्ये स्त्री शिक्षकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.हे संशोधनाच्या माध्यमातून दिसून येते आहे.

**शिफारशी:- संशोधकीने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.**

1. तळागाळातील स्त्रियांपर्यंत शिक्षण अजून पोहचलेले नाही ते पोहोचविण्यासाठी शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक स्त्रियांनी आग्रही व उपक्रमशील राहून त्यांच्या पर्यंत शिक्षण पोहचविण्याचे कार्य करावे.
2. साखर शाळा ,उसतोड कामगार ,दलित वस्ती ,झोपडपट्टी अशा ठिकाणी महिलांना शिक्षित करण्यासाठी प्ररित करावे.
3. आज स्त्री ही सर्व क्षेत्रामध्ये कार्य करीत आहे.यामध्ये शिक्षणक्षेत्र देखील मागे नाही.स्त्रिया संशोधन करणे,विविध अध्ययन अध्यापन पद्धतीचा उपयोग करणे, विद्यार्थ्यांची मानसिकता समजून घेणे.सद्यस्थिती मधील असणारी आव्हाने यांना सामोरे जाणे,ती आव्हाने योग्य पद्धतीने हाताळणे.शिक्षणक्षेत्रामध्ये योग्य प्रगती करण्यासाठी स्त्री शिक्षिका महत्वाची भूमिका पार पाडत आहे.परंतु हे सर्व असताना स्त्रिया अनेक आव्हानांना देखील सामोरे जात आहे. आजच्या काळात स्त्री शिक्षकांना जाणवत आहे. आजच्या समाजामध्ये स्त्री विषयक दृष्टीकोन आजही बदललेला नाही.यामध्ये वेतन कमी ,काम जास्त ,कामाच्या ठिकाणी मानसिक त्रास सहन करणे,यासारख्या अनेक घटनांमध्ये देखील वाढ होत आहे.
4. स्त्रिया शिक्षित जरी झाल्यातरी त्यांच्या मानसिक ताणताणाव निर्माण होतात ते न होण्यासाठी प्रत्येक महिलेला कार्यकर्तुत्वानुसार समजून घेऊन सहकार्य करावे.

**संदर्भ :-**


1. Best J.W.,Khan j.,Jha A.R.(2017);Research in Education;pearson in South Asia.
2. www-esakal-com.cdn.ampproject.org Retrieved on 27 feb 2025
3. Marathi.indiatimes.com Retrieved on 1 March 2025
4. Infinitylearn.com Retrieved on 3 march 2025
5. Rajbhavan-maharashtra.gov.in.Retrieved on 2 March 2025
6. Newsindia.com Retrieved on 2 March 2025
7. www.mahaedunews.com Retrieved on 3 march 2025
8. Mr.quora.com Retrieved on 3 march 2025
9. girls.buzz retrieved on 4 march 2025